**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याची हवाई दलप्रमुखांची माहिती
- निकष पूर्ण न करू शकलेल्या ३४५ राजकीय पक्षांची मान्यता निवडणूक आयोगाकडून रद्द, राज्यातल्या ९ पक्षांचा समावेश
- सणासुदीच्या काळात रेल्वे तिकिट काढणाऱ्यांना मिळणार परतीच्या तिकिटात २० टक्के सवलत
- उत्तराखंडमध्ये अडकलेले राज्यातले बहुतांश पर्यटक आज परतणार

**आणि**

- राज्यात सर्वत्र विविध उपक्रमांनी रक्षाबंधनाचा सण साजरा

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याची माहिती हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी आज बेंगळुरू इथं एका व्याख्यानात दिली. यात पाकिस्तानी हवाई दलाच्या पाच, तर एका सूचना आणि नियंत्रण विमानाचा समावेश असल्याचंही त्यांनी सांगितलं. ही कारवाई जवळपास ३०० किलोमीटर अंतरावरून केल्याचं सांगून जमिनीवरून हवेत मारा करण्याचा हा उच्चांक असल्याचंही सिंह यांनी नमूद केलं. शाहबाज जेकोकाबाद हवाई तळावर भारतानं केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात काही विमानांचं नुकसान झाल्याचंही ते म्हणाले. भारताने या कारवाईदरम्यान अतिशय अचूक हल्ले केले आणि तिन्ही सशस्त्र दलांच्या समन्वयाचं दर्शन घडवलं, तसंच हवाई संरक्षण यंत्रणांनीही उत्तम कामगिरी केली, असं मत सिंह यांनी मांडलं.

**<><><><><>**

गेल्या सहा वर्षांत एकही निवडणूक न लढलेल्या आणि निकष पूर्ण न करू शकलेल्या ३४५ नोंदणीकृत मान्यतप्राप्त राजकीय पक्षांची मान्यता निवडणूक आयोगानं रद्द केली आहे. यात राज्यातल्या आवामी विकास पार्टी, बहुजन रयत पार्टी, भारतीय संग्राम परिषद, इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया, नवभारत डेमोक्रॅटिक पार्टी, नवबहुजन समाजपरिवर्तन पार्टी, पीपल्स गार्डीयन, लोकार्टी ऑफ इंडिया, युवा शक्ति संघटना या पक्षांचा समावेश आहे. त्यामुळे आता देशात २ हजार ५२० नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष राहिले आहेत, तसंच सहा राष्ट्रीय आणि ६७ प्रादेशिक पक्ष आहेत निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

<><><><>

दिवाळी आणि छठ पूजा या सणासुदीच्या दिवसांत परतीचं रेल्वे तिकीट काढणाऱ्यांना परतीच्या तिकिटात २० टक्के सूट देण्याचा निर्णय भारतीय रेल्वेनं घेतला आहे. ‘राउंड ट्रिप पॅकेज’ अंतर्गत दोन्ही बाजूच्या प्रवासाचं आगाऊ तिकीट घेतल्यावरच ही सवलत लागू होईल, तसंच यासाठी जाताना आणि येतानाचे प्रवासी तेच असणं गरजेचं आहे, असं रेल्वे मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या योजनेअंतर्गत आरक्षित केलेलं तिकीट रद्द केलं, तर त्याचा परतावा दिला जाणार नाही. यासाठीचं आरक्षण १४ ऑगस्टपासून सुरू होणार आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या तीन वंदेभारत गाड्यांना हिरवा कंदील दाखवणार आहेत. यात अजनी-पुणे, केएसआर बेंगळुुरु-बेळगाव आणि श्री माता वैष्णोदेवी कटरा-अमृतसर अशा तीन वंदे भारत गाड्यांचा समावेश आहे.

नागपूरहून पुण्याला जाणारी अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी असून ८८१ किमी अंतर कापणारी ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत असेल. ही जलदगती गाडी ७३ किमी प्रतितास वेगाने धावेल आणि नागपूर ते

पुणे दरम्यान १० थांबे घेईल, असं मध्य रेल्वेने आपल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलं आहे.

**<><><><>**

उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यातल्या धराली आणि हर्षिल परिसरात अडकलेले बहुतांश पर्यटक आज राज्यात परतणार असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज दिली. इतर काही पर्यटक पुढच्या यात्रांसाठी रवाना झाल्याचं त्यांनी सांगितलं. या दुर्घटनेत १७२ पर्यटक अडकले होते, त्यापैकी १७१ पर्यटक सुरक्षित असून कृतिका जैन यांचा शोध सुरू आहे.

**<><><><>**

गोंदिया जिल्ह्यातल्या कोचेवाही इथल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाने संगनमत करून चार हजार ७४ क्विंटल धानाचा घोटाळा केल्याचं उघडकीस आलं आहे. याची किंमत ९२ लाख ८२ हजार ३५६ रुपये इतकी आहे. याप्रकरणी १३ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

**<><><><>**

गेल्या सहा महिन्यांपासून अंत्योदय तसंच प्राधान्य योजनेतून धान्य न उचलणाऱ्या शिधापत्रिकांवरचं धान्य बंद करण्याचे आदेश राज्य शासनानं दिले आहेत. यातून शिल्लक राहिलेलं धान्य प्रतीक्षा यादीतल्या शिधापत्रिकाधारकांना देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. राज्यातल्या अशा सुमारे ३ लाख ३३ हजार ८८१ शिधापत्रिकांवरचं धान्य गेल्या सहा महिन्यांपासून उचललं गेलं नसल्याचं राज्य शासनानं निदर्शनाला आणून दिलं आहे. या शिधापत्रिकाधारकांचं धान्य बंद केलं असलं, तरी त्यांची शिधापत्रिका रद्द होणार नाही. त्यांनी धान्याची मागणी केल्यास शिधापत्रिका पुनरुज्जीवित करून पुढच्या महिन्यात त्यांना धान्य देण्यात येईल असं पुणे अन्नधान्य वितरण अधिकारी प्रशांत खातळ यांनी सांगितलं.

**<><><><>**

दिल्लीतल्या जैतपुरा भागात आज मुसळधार पावसानं मंदिराची भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २ मुलं आणि २ महिलांचा समावेश आहे. मंदिराची भिंत झोपडीवर कोसळल्यानं ही दुर्घटना घडली. दिल्लीत काल रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळं अनेक भागात पाणी साचून जनजीवन विस्कळीत झालं. यामुळं सव्वाशेहून अधिक विमानांची उड्डाण उशिरानं झाली.

**<><><><><>**

रक्षाबंधनाचा सण आज राज्यभरात उत्साहात साजरा होत आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी जनतेला रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. मुंबईत राजभवन इथं दृष्टिहीन विद्यार्थिनी, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातून आलेल्या आदिवासी विद्यार्थिनी, मुंबई महानगर पालिकेअंतर्गत महिला बचत गटाच्या सदस्यांनी तसंच पालिकेच्या शाळांमधल्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधनानिमित्त राज्यपालांना राखी बांधून औक्षण केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या निमित्ताने लाडक्या बहिणींशी संवाद साधला आणि त्यांच्याकडून राखी बांधून घेतली. महिलांच्या ५० टक्के सहभागाशिवाय राष्ट्राचा सर्वांगीण विकास शक्य नाही, असे सांगून बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी १०जिल्ह्यांमध्ये 'बचत गट मॉल्स' तयार करण्यात येणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. लाडकी बहीण योजना आगामी पाच वर्षे अखंडपणे सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. धुळे जिल्हा पोलिसांनी रक्षाबंधनानिमित्त महिलांच्या सुरक्षेसाठीच्या ‘डायल ११२’ या हेल्पलाइनचा वापर करण्याचं आवाहन करणारा एक खास व्हिडिओ आज प्रसारित केला आणि महिलांना रक्षाबंधनाची आगळी भेट दिली. परभणी आणि सांगली जिल्ह्यात विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. छत्तीसगडच्या बिलासपूर इथून आलेली, ऑपरेशन सिंदूर या विषयावर आधारित ३५ किलो

वजनाची, ३० फूट लांब आणि ६ फूट रुंद अशी भव्य राखी शिर्डी इथं श्री साई चरणी अर्पण करण्यात आली.

<><><><><>

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त मुंबईत आज गिरगाव चौपाटीवरच्या लोकमान्य टिळक पुतळ्यापासून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली ऑगस्ट क्रांती मैदानापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. गवालिया टँक इथं स्वातंत्र्य चळवळ आणि भारत छोडो आंदोलनातल्या हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. आज देशात हुकुमशाही प्रवृत्ती फोफावली असून ती लोकशाही आणि राज्यघटनेला गिळंकृत करू पाहात आहे. या प्रवृत्तीला चले जाओचा इशारा आम्ही देत आहोत, असं प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केलं.

<><><><><>

जागतिक आदिवासी दिवस आज साजरा होत आहे. राज्याच्या विविध भागात हा दिवस विविध उपक्रम-कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. आदिवासी बहुल नंदुरबार जिल्ह्यात जागतिक आदिवासी दिनानिमित्त पारंपरिक वेशभूषा, आदिवासी गीतं आणि वाद्यांच्या तालावर मिरवणुका काढण्यात आल्या. यात आदिवासी बांधवांनी उत्साहानं भाग घेतला. नवी मुंबईत वाशीमध्ये आदिवासी सांस्कृतिक रॅली काढण्यात आली. यात मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई भागातल्या तरुण-तरुणींनी पारंपरिक नृत्य, लोकगीतं सादर केली. नागपूरमध्येही आदिवासी बांधवांनी आज विविध कार्यक्रम घेतले. शहराच्या विविध भागांमध्ये रॅली काढल्या. भंडारा जिल्ह्यातल्या आदिवासी समुदायानं आज भव्य मिरवणूक काढून लोकनृत्य आणि इतर कला प्रकारांचं सादरीकरण केलं. हिंगोली जिल्ह्यात आदिवासी बांधवांनी राखीव जागा भरण्यासह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

**<><><><><>**

मुंबई सीमाशुल्क विभागाने मुंबई विमानतळावर परवा ९४७ ग्रॅम अमली पदार्थ आणि ३ किलो २ ग्रॅम सोन्याची भुकटी पकडली. एका विमानतळ कर्मचाऱ्याकडून हस्तगत करण्यात आलेल्या या सोन्याच्या भुकटीची किंमत २ कोटी रुपयांहून जास्त आहे. तर बँकॉकहून आलेल्या प्रवाशाकडून ९४ लाख रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाला वन्यजीवांची तस्करी केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अधिकाऱ्यांनी या प्रवाशाची झडती घेतली. यात त्याच्याकडे दोन किंकाशू, दोन पिग्मी मार्मोसेट्स आणि ५० अल्बीनो रेड इयर्ड स्लायडर प्रजातीची कासवं असे जीवंत वन्यप्राणी आढळून आले. या प्रवाशाचं नाव शारुक खान मोहम्मद हसैन असं असून त्याला सीमा शुल्क अधिनियम, १९६२ आणि वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत अटक करण्यात आली.

**<><><><><>**

कोकण आणि विदर्भात येत्या दोन दिवसांत बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**